DOIs:10.2018/SS/202412003 --:-- Research Paper / Article / Review

# “आदिवासी महिलांचा कृषी कार्यातील सहभागाचा अभ्यास : विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा”

**प्रा.ओल्या इरमा वसावे**
साठये महाविद्यालय (स्वायत्त) विलेपार्ले, पूर्व मुंबई, महाराष्ट्र
**Email:** olyavasave@gmail.com

**सारांश:** भारतात कृषी क्षेत्राला आर्थिक विकासाचा कणा म्हणून संबोधले जाते कारण एकूण लोकसंख्येच्या कृषी कार्यात कार्यरत असणाऱ्यांचे प्रमाण खूप जास्त आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्राच्या विकासाला बळ प्राप्त करून देतो. भारतात ९.२% आदिवासी लोकसंख्या आहे त्यापैकी ९०% लोकसंख्या ग्रामीण व डोंगराळ भागात राहत असून ती कृषीवर अवलंबून आहे. नंदुरबार जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. २०११ च्या जनगणनेनुसार ८५% लोकसंख्या ग्रामीण व डोंगराळ भागात राहत असून त्यापैकी ६९.३ कृषि क्षेत्राची संबंधित आहे. आदिवासी महिला कृषी कार्यात शेत साफ करणे, पिक लागवड, खुरपणी, कापणी, मळणी व चारा एका ठिकाणी गोळा करून ठेवणे या कार्याबरोबरच आदिवासी अर्थव्यवस्थेचे महत्वपूर्ण घटक असलेल्या घटकातील भूमिका जसे पशुपालन, कुक्कुटपालन यातील सहभाग देखील खूप मोठा आहे. मात्र सामाजिक व आर्थिक समस्येमुळे महिलांच्या कृषीतील सहभागाला पाहिजे तेवढे महत्व प्राप्त झालेले नाही. रूढी, परंपरा, यामुळे कृषीत घेतले जाणारे निर्णय हे पुरुषकेंद्रित असतात परिणामी महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**बीज शब्द :** आदिवासी महिलांची सामाजिक आर्थिक परिस्थिती, कृषी कार्यातील सहभाग, कृषी- संबधी कार्यातील सहभाग, निर्णय प्रक्रियेतील सहभाग, महिलांच्या समस्या.

## 1. प्रस्तावना:

आदिवासी मुख्यतः ग्रामीण भागात वास्तव्य करत असुन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात आदिवासींची लोकसंख्या ९.६% इतकी होती त्यापैकी ९०% आदिवासी ग्रामीण भागातील डोंगर दऱ्यांमध्ये वास्तव्य करत आहे. ह्या लोकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कृषी व कृषीशी संबंधित असणाऱ्या घटकांचा जास्त प्रमाणात संबंध येत असतो. यात महिला व पुरुषांची कृषी कार्यात असणारी भूमिका बघितल्यास महिला हया पुरुषांच्या मनाने कितीतरी अधिक या कृषी कार्यात दिसून येत आहे. शेत पेरणी पूर्वी शेतातील साफ साफाई करण्यापासून तर शेतीच्या सर्वच कामामध्ये प्रत्येक कार्यात महिलांचा सहभाग महत्वपूर्ण असतो. एवढेच नसून घरातील सर्वच कामात देखील त्यांचा सहभाग तेवढाच महत्वपूर्ण आहे. तसेच आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण स्थान असणारे पशुपालन व कुक्कुटपालन यातील सर्वच कामे महिलांना करावी लागतात. पुरुष साधारणतः नांगरणी व पेरणी पूरतीच कामे करतात, रोजगारचे साधने उपलब्ध नसल्यामुळे पुरूष हंगामी काळासाठी शेजारील राज्यात व तालुक्यात स्थलांतरित होत असतात अशा वेळेत महिला कृषी व घरातील सर्वच कामे प्रखरतेने करतात. मात्र, आतापर्यंत आदिवासी महिलेंचा कृषीत असणारा सहभाग यावर विस्तृत अभ्यास कुणीही केलेला नाही त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी महिलांची कृषीतील एकूण स्थिती समजून घेण्यासाठी प्रस्तुत शोधपत्रात हा अभ्यास विषय निवडला आहे.

## 2. सशोधन साहित्याचे पुनर्विलोकन:

“Participation of women in Agricultural production” या शोधपत्रात निशी स्थालिया, यांनी भारतात आज ७८% महिला कृषीवर अवलंबून आहे. हेच प्रमाण पुरुषांच्या बाबतीत ६३% असून एका हंगामापासून तर दुसऱ्या हंगामापर्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याचबरोबर महिला पशुपालन व घरातील कामात महिलांसेच वर्चस्व आहे, असे असुनही लिंगभेद, परंपरा व रूढी वादी दृष्टीकोण यामुळे महिलांना अनुत्पाद्क असे सबंधित केले जाते. महिलांची कृषीतील भूमिका महत्वाची असून सरकारने योग्यो ते प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

“Work participation of tribal women in India: a development prospective” या शोधपत्रात गुम्माडी नरेश यांनी, महिलांच्या भूमिकेवर प्रकाश टाकला आहे. सीमान्त व मुख्य कामगार म्हणून काही बदल झाले असले तरी एकंदरीत कृषी कामातील महिलांचा सहभाग वाढत आहे. मात्र कमी शिक्षण, वन कायद्यात होणारे बदल तसेच सध्याच्या काळात निर्माण होणाऱ्या नव-नवीन समस्या यामुळे महिलांचा सहभाग जितका असला हवा तो नाही.

“Participation of tribal women in agriculture”, या शोधपत्रात आर. मोहता यांनी मयुरभंज जिल्ह्यातील आठ गावातील 120 एवढ्या महिलांकडून माहिती गोळा केली. त्यांच्या निष्कर्षनुसार, महिलांचा कृषी कार्यात सर्वात जास्त सहभाग हा पीक लागवडी मध्ये आहे त्यानंतर धान्य वाळविणे, कापणी, खुरपणी यातील सहभाग दाखविला आहे. तसेच स्वयंपाक गृहातील कामे, शेळीपालन, दुग्धउत्पादन, कुकुटपालन मध्ये सर्वात जास्त वेळ अनुक्रमे घालवीत असून महिलांचे वय व शिक्षण याचा परिणाम जास्त होत नसल्याचे सांगतात.

“Role performance of tribal women in agriculture: a study in agency area of east gadavari district”, या शोधपत्रात के. शुमान कल्याणी, याने पूर्व गोदावरीतील पाच पंचायीतीमधून 200 महिलांचा अभ्यास केला आहे. त्यानुसार महिलांचा कृषीत सहभागाचा दर खूप जास्त असून महिला सरासरी 16.8 तास व पुरुष १२.१ तास काम करतात. कमी सामाजिक-आर्थिक परिस्थिती असणाऱ्या घरात कुटुंबाच्या उत्पन्नात महिलांचे योगदान जास्त असल्याचे दिसून येते. अनुकर्मे धान्य साठवण, पिकलागवड ,नर्सरी वाढविणे यात महिलांचा सहभाग जास्त तर पुरुषांचा अनुक्रमे नांगरणी,कापणी यात जास्त असल्याचे दिसून येते

“बदलत्या शोधातील ग्रामीण स्त्री”, डॉ. अश्विनी धोगडे, यांचा लेख दैनिक लोकसत्ताने 29 ऑगस्ट 2015 रोजी प्रकाशित केला. यात सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात जितका बदल झाला तसा बदल स्त्रियांच्या बाबत झाला नाही, घरकामात महिलांचा सहभाग हा पुरुषांपेक्षा अनेक पटीने जास्त राहील मात्र हे काम महिलाना बहुतेक वेळेच विना वेतन किवा अल्पवेतनाने करावे लागते. या समस्ये सोबतच महिला आपल्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात अनेक संकटांना सामोरे गेलेल्या आहे तरीदेखील कृषीत स्त्रियांचा सहभाग कमी झाला नाही. कृषी समस्येचा एक भाग म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात होतात, त्या तुलनेने महिला आत्महत्येचे प्रमाण कमी आहे कारण स्त्रिया अनेक संकटांना अगोदरच सामोरे गेलेल्या असतात.

“कृषिकन्या” महिला किसान दिवस विशेष”, हा निहारिका कोढालकर यांचा लेख, ॲग्रो मासिकात 15 ऑक्टोबर 2018 रोजी प्रकाशित झाला. यात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना त्यापेक्षा अधिक काम करतात. स्वता:च्या शेतात काम करण्याबरोबरच मजुरीसाठी व मदत म्हणून दुसऱ्याच्या शेतात देखील काम करतात. त्याच वेळेच घरातील कामे सक्षमपणे सांभाळत असतात, एवढे करूनही महिलाना दिला जाणारा मोबदला हा अत्यल्प असतो. या लेखात असे ही म्हटले आहे की, त्यांच्यावर विश्वास टाका, संधी द्या, त्यातून महिला आपले कर्तुत्व दाखवून देतील.

“शेतकरी स्त्रियां आजही तुरुंगातच”, हा प्रतिमा परदेशी यांचा लेख, राईट्स आग्ल्स मासिकात 13 फेब्रुवारी 2018 रोजी प्रकाशित झाला. यात कृषी मातृसत्ताक होती मात्र काळाच्या ओघात पितृसत्ताक झाली. कृषीत महिलांचा सहभाग पुरुषांच्या तुलनेने जास्त असूनही कृषी संबंधी निर्णय स्त्रियांना डालवुन पुरुषांकडून घेतले जतात. त्यासाठी सरकरचे सर्वसमावेशक धोरण असणे गरजेचे आहे काही वर्षापुर्वी कृषीतून मिळणारे उत्पन्न महिला आपल्या गाठीची ठेवीत असे मात्र 1991 च्या जगतीकरणानंतर ते देखील मिळत नाही म्हणून स्त्रियां ह्या “घर” नावच्या बंदिवासात लोटल्या गेल्या आहे.

**3. उद्दिष्टे :**

- आदिवासी महिलांचा कृषी कार्यातील सहभागाचा अभ्यास करणे.
- आदिवासी महिलांच्या समस्येचा अभ्यास करणे.

**4. गृहीतके :**

- आदिवासी महिलांचा कृषि कार्यात महत्वपूर्ण सहभाग आहे.

**5. संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनाचा वापर केलेला आहे. दुय्यम संशोधनासाठी शासनाचे वेगवेगळे अहवाल, प्रकाशित शोध प्रबंध, संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर केलेला आहे.

**6. अ) महिलांची सामाजिक आर्थिक परिस्थिती :**

आदिवासी महिलांची सामाजिक आर्थिक परिस्थिती त्यांच्या एकंदरीत विकासाला अडथळा ठरते. अनेक रूढी, परंपरा, धार्मिक व आयात केलेली संस्कृती हे सामाजिक घटक यामुळे महिलांचे कार्यक्षेत्र कमी करतात. जास्तीत जास्त निर्णय महिलेच्या समस्येला गृहीत न धरता पुरुषाकडून घेतले जातात पर्यायाने घरची पारंपरिक शेती कामातच त्यांना राहावे लागत आहे. निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसल्यामुळे महिलांची आर्थिक स्थिति खालवून महिलांचे पुरुषांवरील परावलंब वाढतच जाते. डॉ. सीमा श्रीवास्तव व डॉ. सुनीता जैन यांनी आपल्या शोध ग्रंथात शिक्षण व आर्थिक स्तर हे एकमेकांच्या समांतर दिशेने काम करतात असे म्हटले आहे. आजही आदिवासी महिलेत शिक्षणाचे प्रमाण खूप कमी असल्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर खालवल्याचे दिसते परिणामी शेवटी त्यांचे पुनर्वसन कृषीतच होते.

**ब) कृषी कार्यातील सहभाग:**

२०१६ मध्ये सयुक्त राष्ट्र संघाच्या शेती आणि अन्नविषयक सस्थेने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार पुरुष हा शेतीच्या कामापासून दूर जात आहे तर महिलाचा शेती अंतर्गत विविध कार्यात सहभाग वाढत असल्याचे म्हटले आहे. नंदुरबार जिल्हयातील आदिवासिंची शेती मुख्यतः निसर्गावर अवलंबून असून त्यात पारंपरिक पीक पद्धतीने घेतले जातात. त्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य कमी व हलकया प्रतीचे असते. ते परिसरातील असणाऱ्या लाकडांपासून बनवलेले असते परिणामी हलक्या प्रतीची कामे म्हणून ती केवळ आणि केवळ महिलांच्याच वाट्याला येतात. त्यामुळे प्रत्येक कृषी कार्यात महिलांचा सहभाग वाढत असतो अगदी शेत साफ करणे, नांगरणीच्या वेळेचं शेतातून गवत काढणे, बियाणे टाकणे, खुरपणी, कापणी करणे, पीक गोळा करणे, मळणी नंतर चारा वाहून नेणे ही सर्व कामे महिला करीत असतात. अगदी स्वताच्या शेतातील काम पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्याचा शेतावर मजुरी किवा मदत म्हणून कामासाठी देखील महिलाच सहभागी होतात यात पुरुषांचा सहभाग अत्यल्प असतो मात्र मिळणारे उत्पन्न कामाच्या तुलनेत अत्यंत अल्प पटीने कमी असते. झालेल्या सर्वेनुसार १४ देशाची आकडे वारी गोळा केली त्यात असे दिसून आले की महिलाना पुरुषांच्या मानाने २८% कमी मोबदला दिला जातो. पुरुषांची भूमिका मात्र नांगरणी व पेरणीपुरतीच मर्यादित राहते. रोजगाराच्या अभावामुळे पुरूषांना नेहमीच हंगामी स्थलांतरित करावे लागते डॉ. डि. आर. जगताप यांच्या “Economic and Social status of Migration of Aadivasis in Nandurbar District” या शोधपत्रांनुसार 70% आदिवासी कुटुंबाचे स्थलांतरण होते. या काळात कृषी कार्ये ही महिलांनाच करावी लागतात जे अनेक शोधग्रंथात देखील मान्य करण्यात आलेले आहे.

**क) कृषीजन्य कामातील महिलांचा सहभाग:**

२०११ च्या जन गणणेनुसार ६९.३% लोकसंख्या कृषीची संबंधीता आहे. यात महिलांचे प्रमाण ४२.२% असल्याचे सांगितले आहे. महिलांचा सहभाग केवळ कृषि कार्यातच नसून तो ह्या व्यतिरिक्त घर सांभाळणे, जेवण बनविणे, अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण भाग असलेल्या व अनिश्चिततेच्या काळातील कुटुंबाचा आधार असलेल्या पशुपालनातील भूमिका, कुक्कुट पालनातील भूमिका ह्या सर्व कामात महिलांचा सहभाग हा खूप मोठया प्रमाणात दिसून येतो. महिलाना यातून थोड्याफार प्रमाणात पैसेही मिळतात जे कुटुंबाच्या उदरर्निर्वाहासाठी उपयोग करीत असतात.

### ड) निर्णय प्रक्रियेतील सहभाग :

महिला सरासरी १६ ते १७ तास काम करूनही महिलाना निर्णय प्रक्रियेत कमी महत्व देण्यात येते. पीकाच्या निवडीबाबत काही प्रमाणात महत्व आहे. मात्र इतर व्यवहारात महिलाना डालावूनच निर्णय घेतले जातात. जसे गुरांची, अवजरांची व धान्याच्या खरेदी विक्रीतील महिलांचा सहभाग खूपच कमी असतो. आंतरराष्ट्रीय संशोधनसस्थेचे ICARDA **तज्ञ** दिना नज्जर म्हणतात की "महिला कृषीत कामात असल्या तरी विपणन आणि पैसची उलाढाल पुरुष मंडळीच करतात जिथे महिलाना अधिकारच नसतो." ह्यामुळे एकंदरीत महिलांचे अवलंबितव पुरुषावर वाढत जाते व अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

### इ) महिलांच्या समस्या:

ग्रामीण भागातील आदिवासी महिलांच्या दिवसाची सुरुवात पहाटे ५ वाजता होते तर कुटुंबातील सर्व सदस्य झोपे पर्यंत ते झोपल्यानंतर दिवसाची शेवट होते. शेतीची जड कामे, निकृष्ट प्रतीची कामे, वाकून करावी लागणारी कामे, अशी वेगवेगळ्या प्रकारची एकाच वेळेच कराव्या लागणाऱ्या कामांमुळे त्याचबरोबर इतर सामाजिक व आर्थिक समस्येमुळे महीलाना अनेक आरोग्याच्या संबंधित समस्या निर्माण होतात. जसे पाय दुखणे, कंबर दुखणे, गर्भपात होणे, डोके दुखणे अशा समस्या महिलांना भेडसावतात परिणामी आदिवासी भागातील महिला ह्या तारुण्यातच म्हाताऱ्या दिसतात.

## 7. निष्कर्ष:

एकंदरीत नंदुरबार जिल्ह्यातील महिलांचे कृषी कार्यात असलेले प्रमाण पुरुषपेक्षा अनेक पटीने जास्त आहे जे केवळ कृषी कार्यातच नव्हे तर कृषी व्यतिरिक्त इतरही कार्यात महत्वपूर्ण आहे. जसे पीक लागवड, शेत साफ करणे,शेतील सहबियाणे शेतात टाकणे, खुरपणी, कापणी, मळणी, चारा वाहून नेणे व एका ठिकाणी साठवून ठेवणे, यासह घरातील सर्वच कामे जसे जेवण बनविणे, पशुपालन तसेच कुक्कुटपालन ही कामे देखील महिलांनाच करावी लागतात.

## 8. उपाययोजना :

- सामाजिक आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारी पातळीवर भरीव कार्ये होणे आवश्यक आहे. ज्यात अंधश्रद्धा,रूढी - परंपरा यांना आळा घालणे व महिलांना आर्थिक अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.
- महिलांचा सहभाग कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात असतो, एकाच वेळेच अनेक कामे करावी लागतात त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर अनेक अंगाने परिणाम होतात ते महिलाना समजावून सांगणे.
- आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी शासन स्थरावरून महिलाना प्रत्यक्ष लाभ मिळेल अशा योजना आखणे.
- आरोग्याच्या सोयी सुविधा सहज उपलब्ध होईल अशी व्यवस्था सरकारी पातळीवर निर्माण करणे.
- शेतीकामात काम करणाऱ्या महिलांची वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे.

### संदर्भ साहीत्य:

1. प्रो डॉ.वर्षा, गंगावणे,(२०१८) आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक समस्या व सामाजिक समस्या. त्रृचा प्रकाशन
2. Waghmare, S., & Chaudhary, N. (1989). *Tribal Women in Agriculture*, Metropolitan Publication, New Delhi.
3. Kalyani K. Suman, V. Krishnamurty, (2010) "Role Performance of Tribal Women in Agriculture: A Study in Agency Area of East Gadavari District"
4. R. Mohanta, (2017), Participation of Tribal Women in Agriculture", ISSN 2278-3687 (0)
5. Gummadi N., Work participation of tribal women in India: a development prospective, (IOSR-JHSS), ISSN 2279-0837.
6. Dr. D. R. Jagtap (June 2016), economic and social studies of migration of adivasis in Nandurbar district, international journal of applied research2016;2(7)883-886
7. Unnati. A, G.S Ankush and A. V. Mande (2012) "Extent of participation of farm women in Decision making"
8. नंदुरबार जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१८. (n.d.). In *https://nandurbar.gov.in*.
9. https://censusindia.gov.in/census.website/.
10. www.Ministry of tribal affairs Government of India, M. of T. A. (n.d.). reports. In *Schemes*.
11. www.tribal development of Maharashtra
12. www.Trtimah. Govt.in